# सोलापूर ग्रामीण पोलीस दल, प्रेस नोट दि. २०/०५/२०२०

Email. ID- prosolapurrural@gmail.com
Control Room Phone No. 0217-2732009, 0217-2732010


## डॉ. शिवरत्न शेटे यांचे सोलापूर ग्रामीण पोलीसांना आरोग्यविषयक प्रबोधन

दि. २०/०५/२०२० रोजी ११.०० वा.सु. पोलीस अधिक्षक कार्यालयाचे आवारात सोलापूर ग्रामीण पोलीस दलाकडील पोलीस अधिकारी, कर्मचारी यांचेकरिता आयुर्वेदिक च्यवनप्राश व काढा/चुर्ण याचे महत्व या विषयावर डॉ. शिवरत्न शेटे यांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते.

श्री. अतुल झेंडे, अपर पोलीस अधिक्षक यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यानंतर डॉ. प्रदिप ढेले, सिव्हील सर्जन, छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रूग्णालय, सोलापूर यांनी कोरोना विषाणुस प्रतिबंध करण्यासाठी पोलीसांनी काय दक्षता घेतली पाहिजे याबाबत माहिती सांगितली.

त्यानंतर डॉ. शिवरत्न शेटे यांनी कोरोना विषाणुचा किंवा इतर कोणत्याही विषाणुचा प्रतिबंध करण्यासाठी आयुर्वेदामधील आरोग्यविषयक प्रबोधन केले. प्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी आयुष मंत्रालय तसेच राज्य शासनाकडुन देखील आयुर्वेदामधील औषधांची शिफारस केली आहे असे सांगितले. त्यानंतर त्यांनी आपल्या देशामध्ये यापुर्वी आलेल्या विषाणु/आजारावर, सध्या आलेल्या कोरोना विषाणु तसेच यापुढेही येणा-या विषाणुवर मात करण्यासाठी व आपली प्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी आयुर्वेदामधील च्यवनप्राश व काढा/चुर्ण याचे नियमित सेवन केल्यास ते फार गुणकारी असल्याचे सांगितले. आयुर्वेदिक औषधांचे कोणतेही साईड इफेक्ट नसल्याचे सांगितले. पोलीसांना आयुर्वेदिक औषधाचे अनुषंगाने २४ तास फोनवर सेवा देण्यास तयार असल्याचे सांगितले. आयुर्वेदामधील च्यवनप्राश व काढा/चुर्ण याचा तुटवडा निर्माण झाला असल्याने हिमाचल प्रदेश येथुन मागवुन पोलीसांकरिता उपलब्ध करून दिल्याचे सांगितले. इम्युनिटी वाढविण्यासाठी च्यवनप्राश, काढा/चुर्ण इ. चा पोलीसांना नक्की उपयोग होईल असे सांगितले.

श्री. मनोज पाटील, पोलीस अधिक्षक यांनी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव पसरवु नये यासाठी पोलीसांचे आरोग्याची काळजी घेण्यात येत आहे, असे सांगुन पोलीसांचे आरोग्य सशक्त व सदृढ ठेवण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आल्या आहेत. तसेच आम्ही यापुर्वीही विविध विभागातील तज्ञ डॉक्टरांचे आरोग्यविषयक मार्गदर्शन मोबाईल ॲपव्दारे व फेसबुक लाईव्हव्दारे आयोजित करण्यात आल्याचे सांगितले. सोलापूर शहरात राहणारे १३ सोलापूर ग्रामीण पोलीसांना कोरोनाची बाधा झाली होती. त्यापैकी ११ पोलीसांना डिस्चार्ज मिळाला आहे. त्यांची प्रकृती ठणठणीत बरे होवुन घरी गेले आहेत. उर्वरित २ कर्मचारी यांची तब्येत चांगली असल्याचे सांगितले.

तसेच सोलापूर ग्रामीण पोलीस दलाकडील पोलीस अधिकारी, कर्मचारी यांचेकरिता मास्क २५,७१८, सॅनिटायझर १,५७० लिटर, पीपीई किट १३७ नग, हॅन्डग्लोव्हज ४९०, फेस शिल्ड १३११, थर्मल स्कॅनर २६, फिंगर ट्रिप प्लस २६, च्यवनप्राश २३००, काढा/चुर्ण २३०० पाकिटे, आर्सेनिक गोळया २५८८, एचसीक्यु गोळया ६११, Pvit-C & Vit- D- ८०० इ. साहित्य पाठविण्यात आले आहे.

सदर वेळी मान्यवरांकडुन उपस्थित पोलीस कर्मचारी, मंत्रालयीन कर्मचारी, पत्रकार व नागरिक यांना च्यवनप्राश, काढा/चुर्ण, आर्सेनिक गोळया इ. वाटप करण्यात आले. शेवटी श्री. अतुल झेंडे, अपर पोलीस अधिक्षक यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. सदर वेळी श्री. अरुण सावंत, पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय), श्री. दंताळ, पो.नि., एमटी, श्री. विक्रांत बोधे, सहा. पोलीस निरीक्षक, व कार्यालयातील पोलीस अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते.

प्रति,

मा. संपादक,

नमुद बातमी आपले लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द होणेस विनंती आहे.